विलुप्तीच्या मार्गावर असलेल्या महासीर माशाच्या संवर्धनासाठी टाटा पॉवरचा पुढाकार

# ‘ॲक्ट फॉर महासीर’ मोहीम

। रुपाली नाणेकर ✍ ।

## भारतातील ‘पहिल्या महासीर हॅचरीज’चे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

येथील टाटा पॉवर कंपनीच्या मालकीच्या वलवण धरणाच्या क्षेत्रात कंपनीने भारतातील पहिली महासीर हॅचरीज उभारली असून, विलुप्तीच्या मार्गावर असलेल्या या महासीर अर्थात गोड्या पाण्यातील देवमाशाला वाचवण्यासाठी कंपनीने पुढाकार घेतला आहे. यासाठी नुकतीच विद्यार्थ्यांना या हॅचरीज सेंटरची भेट घडवून मत्स्य संवर्धनासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.



### हॅचरीज सेंटरला भेट

टाटा कंपनीने सामाजिक बांधीलकी जपण्याच्या उद्देशाने ही हॅचरीज उभारली असून याठिकाणी विलुप्त होत असलेल्या महासीर जातीच्या माशांचे उत्पादन तसेच संवर्धन करण्यात येत आहे. शालेय अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना आपल्या नैसर्गिक समृद्धतेची जाणीव व्हावी यासाठी कंपनीने नुकत्याच एनर्जी क्लबचे सदस्य असलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांची हॅचरीज सेंटरला भेट घडवून आणली.

### महासीर म्हणजे काय?

» मोठमोठ्या नद्या, धरणे अथवा विस्तीर्ण जलाशयात आढळणारी ही प्रजाती असून या माशाची पूर्ण वाढ झाल्यास त्याचे वजन ३० ते ३५ किलोपेक्षाही जास्त भरते. त्याच्या अवाढव्य आकारमानामुळे या माशाला गोड्या पाण्यातील देवमासा असे संबोधण्यात येते.

» देहू या धार्मिक स्थळी पूर्वी मोठ्या संख्येने महासीर आढळत होते. येथे येणारे भाविकही या माशांना देवाचे मासे समजून खायला देत असत. परंतु कालांतराने बेसुमार मासेमारीमुळे या नदीतुन हा मासा पुर्णपणे विलुप्त झाला होता. त्यानंतर टाटा कंपनीने पुढाकार घेत या नदीपात्रात पुन्हा महासीर माशाची पिल्ले सोडुन पुनरुःजीवन देण्याचा प्रयत्न केला होता.



### विविध शाळांमधील ४८ विद्यार्थ्यांचा सहभाग

» यामध्ये पवार पब्लिक स्कूल, भांडुप, नालंदा स्कूल, ठाणे, उदयांचल गोदरेज स्कूल विक्रोळी, लोकमान्य स्कुल, मुलुंड, एम्इएस स्कूल, कुर्ला, सीइएस मायकल स्कूल, कुर्ला लोकपुरम पब्लिक स्कूल, डी.ए.व्ही. स्कूल आदी शाळांमधील ४८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

यावेळी विद्यार्थ्यांना महासीर माशाच्या जीवनातील विविध टप्प्यांवर प्रत्यक्ष निरिक्षण करता आले, तसेच पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून महासीर प्रजातीचे महत्वही समजावून घेता आले.

यावेळी महासीर प्रेमी विद्यार्थ्यांनी या माशाची प्रजाती वाचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याची हमी दिली. तसेच नागरिकांनीही या मोहीमेत आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन कंपनीच्यावतीने करण्यात आले आहे.